# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः03.08.2025** **वारःरविवार**

---

• किसान सम्मान निधी, शेतकऱ्यांच्या कल्याणाप्रती सरकारच्या वचनबद्धतेचं द्योतक असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन, विसाव्या हप्त्याचं वाटप

•भारताला स्पेनकडून सोळा एअरबस सी-295 लष्करी वाहतूक विमानांचं हस्तांतरण

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाकडून आयुर्वेदिक आहाराची यादी जाहीर

आणि

• भारत-इंग्लंड पाचवी कसोटी रंगतदार अवस्थेत

**<u>पंतप्रधान</u>**

**<u>इंट्रो</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल वाराणसी इथून किसान सन्मान निधीचा २० वा हप्ता वितरित केला आणि देशभरातील ९ कोटी ७० लाखांहून अधिक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात २० हजार ५०० कोटी रुपये थेट हस्तांतरित केले. पंतप्रधानांनी वाराणसीकरिता बावीसशे कोटी रुपयांच्या ५२ विकास प्रकल्पांची देखील पायाभरणी आणि उद्घाटन केलं. सरकारनं शेतकऱ्यांसाठी लहान जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित करण्याच्या उद्देशानं नवीन पीएम धनधान्य योजना देखील सुरू केली असल्याचं सांगताना पंतप्रधान म्हणाले...

**<u>(मोदी-बाईट-३५ सेकंद)</u>**

जागतिक व्यापार युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी स्वदेशीच्या मुद्द्यावर पुन्हा भर दिला. ते म्हणाले...

**<u>(मोदी-बाईट-२७ सेकंद)</u>**

निधी वितरणाच्या पुण्यातील कार्यक्रमात कृषीमंत्री दत्तात्रय भरणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून दूरस्थ पद्धतीनं उपस्थित होते. तर बुलढाणा इथल्या कृषी विज्ञान केंद्र इथं घेण्यात आलेल्या कार्यक्रमात केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव सहभागी झाले होते.

गडकरी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार आर्थिक विकासासाठी पायाभूत सुविधा मजबूत करत असल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. आंध्र प्रदेशातील मंगलागिरी इथे राज्यातील  ५ हजार २३३ कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूकीच्या २७२ किमी लांबीच्या २९ राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचं उद्‌घाटन आणि पायाभरणी केल्यानंतर गडकरी काल बोलत होते. गेल्या अकरा वर्षात राष्ट्रीय महामार्गांची  लांबी १२० टक्क्यांनी वाढली आणि  २०१४ मध्ये असलेले ४ हजार  किलो मीटर लांबीचे राष्ट्रीय महामार्ग लांबी आता ८ हजार ७०० किलो मीटर झाल्याची माहिती गडकरी यांनी दिली आहे. सुधारित रस्ते पायाभूत सुविधांमुळे, दळणवळणाचा खर्च १६ टक्क्यांवरून १० टक्क्यांपर्यंत कमी झाला असून  डिसेंबर २०२५ पर्यंत हा खर्च आणखी नऊ टक्क्यांपर्यंत कमी होण्याचा अंदाज आहे असं त्यांनी सांगितलं.

**<u>विमाने</u>**

भारताला स्पेनकडून काल १६ एअरबस सी-२९५ लष्करी वाहतूक विमानं सोपविण्यात आली. स्पेनमधील सेव्हिल इथं भारतीय राजदूत दिनेश के. पटनायक आणि भारतीय वायु दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा हस्तांतरण सोहळा पार पडला. गुजरातमधील वडोदरा इथल्या कारखान्यात ही विमानं जुळवली जातील. २१,९३५ कोटी रुपयांच्या या करारामुळं जुन्या ताफ्याची जागा ही विमानं घेतील. सी-२९५ हे बहुपयोगी वाहतूक विमान सामरिक मोहिमा, माल वाहतुक आणि वैद्‌यकीय बचाव कार्यांसाठी महत्त्वाचं आहे.

**<u>अश्विनीवैष्णव</u>**

केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आज भावनगर रेल्वे स्थानकावरून भावनगर-अयोध्या साप्ताहिक रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखवतील. रेवा - पुणे दरम्यान आणि जबलपूर - रायपूर दरम्यानच्या दोन रेल्वे गाड्यांचं उद्‌घाटनही दूरस्थ पद्‌धतीने वैष्णव यांच्या हस्ते होणार आहे.

**<u>निवडणूकआयोग</u>**

भारत निवडणूक आयोगाने BLO म्हणजे मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याचं वार्षिक मानधन दुप्पट करण्याचा तसंच बीएलओ पर्यवेक्षकांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. ERO अर्थात मतदार नोंदणी अधिकारी आणि AERO म्हणजेजान सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांना प्रथमच मानधन देण्यात येणार आहे. अचूक आणि पारदर्शक मतदार यादी ही लोकशाहीचा भक्कम आधार आहे.  त्यामुळे मतदार यादी तयार करण्यासाठी तसंच तिच्या पुनरावलोकनासाठी मेहनत घेणाऱ्या अधिकाऱ्यांचा सन्मान करण्याकरिता निवडणूक आयोगानं हे पाऊल उचललं आहे.

या नव्या  तरतुदीनुसार बीएलओचे मानधन ६ हजार रुपयांवरून १२ हजार  तर मतदार यादी पुनरावलोकनासाठी बीएलओ प्रोत्साहन रक्कम एक हजारावरून २ हजार  करण्यात आली आहे. तसंच बीएलओ पर्यवेक्षकांना  १२ हजार ऐवजी १८ हजार रुपये देम्यात येतील. एईआरओ यांना प्रथमच २५ हजार तर ईआरओ यांनाही प्रथमच ३० हजार रुपये मानधन देण्यात येईल.

याशिवाय, बिहारपासून सुरू झालेल्या या विशेष तीव्र पुनरावलोकन मोहिमेसाठी बीएलओंना ६ रुपयांचं विशेष प्रोत्साहन मानधन देण्यात येणार आहे.

**NEET**

वैद्यकीय प्रवेशासाठी घेण्यात येणारी NEET PG प्रवेश परीक्षा आज देशभरातील अनेक केंद्रांवर एकाच वेळी होणार आहे. सकाळी ९ ते दुपारी साडेबारा वाजेपर्यंत एकाच सत्रामध्ये होणाऱ्या परीक्षेसाठी सुमारे अडीच लाख उमेदवारांनी नोंदणी केली आहे.

**जम्मूकाश्मीर**

जम्मू काश्मीरमधल्या कुलगाम जिल्ह्यातल्या अखल देवसर भागात आज सकाळी सुरक्षा दलांसोबत सुरू असलेल्या चकमकीत तीन दहशतवादी ठार झाले. या भागात दहशतवादी असल्याची माहिती सुरक्षा दलांना मिळाल्यानंतर काल संध्याकाळी शोधमोहीम सुरू करण्यात आली होती. लष्कर, जम्मू काश्मीर पोलीस आणि सीआरपीएफने संयुक्तपणे ही मोहीम राबवली. सुरक्षा दल आणि दहशतवादी यांच्यात रात्रभर गोळीबार सुरू होता.

**आयुर्वेदआहार**

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने आयुष मंत्रालयाशी सल्लामसलत करून आयुर्वेदिक आहाराची यादी जारी केली आहे. २०२२ मध्ये अन्न सुरक्षा आणि मानके - आयुर्वेद आहार नियम लागू झाल्यानंतर, उचललेलं हे महत्त्वपूर्ण पाऊल आहे. यामुळे भारताच्या पुरातन काळापासून नावाजलेल्या अन्नपदार्थांच्या ज्ञानाला मुख्य प्रवाहात आणलं जाणार आहे. अधिकृत आयुर्वेदिक ग्रंथांमधील पाककृती, घटक आणि प्रक्रियांवर आधारित अन्न पदार्थांना यामुळे मान्यता मिळून ग्राहक आणि व्यवसायांना आत्मविश्वास मिळणार आहे. आयुर्वेदिक आहार उत्पादने तयार करण्यासाठी व्यवसायांना विश्वसनीय संदर्भ सामग्री देखील याद्वारे प्रदान केली जाणार आहे. आयुष आणि आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाचे राज्यमंत्री प्रताप राव जाधव यांनी लोकांना आरोग्याच्या दीर्घकालीन फायद्यासाठी दैनंदिन जीवनात आयुर्वेदिक आहाराचा समावेश करण्याचं आवाहन केलं आहे. आयुर्वेदिक आहार शरीराच्या पोषणाबरोबरच रोगप्रतिकारक शक्ती, पचन आणि एकूण आरोग्यासाठी उपयुक्त आहे. या उपक्रमामुळे अन्न उद्योगामधील नियामक स्पष्टता वाढून चांगल्या आरोग्यासाठी आयुर्वेद-आधारित पोषणाचा मोठ्या प्रमाणात स्वीकार केला जाईल.

**सरन्यायाधिश**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्राला दिलेल्या संविधानानं; सर्वांना समान संधी देणारी व्यवस्था देशात तयार केली, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. नागपूर इथल्या डॉ आंबेडकर महाविद्यालयाच्या हीरक महोत्सवी सोहळ्यात ते काल बोलत होते. या कार्यक्रमाला सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई देखील उपस्थित होते.

डॉक्टर आंबेडकर यांनी दिलेला सामाजिक आणि आर्थिक न्यायाचा संदेश आचरणात आणण्याची गरज असल्याचं सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी सांगितलं.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि इंग्लंड अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतील ओव्हल इथला पाचवा आणि अंतिम सामना रंगतदार अवस्थेत पोहोचला आहे. आकाशदीपनंतर रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर यांच्या अर्धशतकाच्या आणि यशस्वी जयस्वालच्या शतकी खेळीच्या जोरावर भारतानं दुसऱ्या डावात 396 धावा केल्या. विजयासाठी 374 धावांचं उद्दिष्ट गाठताना तिसऱ्या दिवअखेर इंग्लडच्या 1 बाद 50 धावा झाल्या. सामन्याचे दोन दिवस बाकी आहेत.

**<u>हवामान</u>**

अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, सिक्कीम आणि उप-हिमालयीन पश्चिम बंगालमध्ये तीव्र मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. बिहार, पूर्व उत्तर प्रदेश, केरळ, माहे, तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल आणि उत्तराखंडमध्ये दिवसभर मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज असून ; मध्य प्रदेश, राजस्थान, हरियाणा, चंदीगड, हिमाचल प्रदेश, झारखंड, लक्षद्वीप, रायलसीमा आणि पश्चिम उत्तर प्रदेश या ईशान्य भारतातील काही भागातही अशीच परिस्थिती अपेक्षित आहे. नवी दिल्ली एनसीआरमध्ये आज दिवसभर आकाश ढगाळ राहून विजांच्या कडकडाटासह मध्यम पावसाचा अंदाज आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार**